महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२६ वे | दिनांक : ३०/०४/२०२६ | वार गुरूवार

## बुलढाणा मेडिकल कॉलेजला राजमाता जिजाऊंचे नाव - राज्य शासनाचा मोठा निर्णय



**बुलढाणा :** बुलढाण्यातील १०० विद्यार्थी क्षमता आणि ४३० खाटांचे संलग्न रुग्णालय असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आता 'राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा' असे नामकरण करण्यात आले आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाने यासंदर्भात अधिकृत शासन निर्णय निर्गमित करून या नामकरणाला मंजुरी दिली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा हे राजमाता जिजाऊंचे जन्मस्थान असल्याने, येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला त्यांचे नाव देऊन त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला आहे. राष्ट्रप्रेम, त्याग आणि शौर्याचे प्रतीक असलेल्या राजमाता जिजाऊंनी आपल्या दूरदृष्टीने आणि संस्कारांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा दिली. स्त्रीशक्तीचे प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊंच्या नावासोबत या महाविद्यालयाला आता एक उच्च आदर्श आणि लोककल्याणाची जोड मिळाली आहे.

या निर्णयामुळे जिल्ह्याच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला असून, 'राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय' हे केवळ एक शैक्षणिक केंद्र न राहता उत्तम आरोग्य सेवेचे ऊर्जाकेंद्र ठरेल. जिजाऊंच्या कार्याचा वारसा पुढे नेणारे हे महाविद्यालय भविष्यात जिल्ह्याच्या सामाजिक आणि वैद्यकीय विकासात मोलाचे योगदान देईल, अशी आशा या निमित्ताने व्यक्त केली जात आहे.

राजमाता जिजाऊ यांच्या दैदिप्यमान कार्याचा गौरव करण्यासाठी बुलढाणा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव 'राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय' असे करण्यास शासनाने अधिकृत मंजुरी दिली आहे. हा निर्णय केवळ एका वास्तूचे नामकरण नसून, राजमातांच्या महान आदर्शांना आणि त्यांच्या दूरदृष्टीला वाहिलेली एक कृतज्ञतापूर्वक आदरांजली आहे, ज्यामुळे त्यांच्या स्मृतींचे जतन आरोग्य क्षेत्रातही होईल.

या ऐतिहासिक निर्णयामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना जिजाऊंच्या त्याग, कर्तव्यनिष्ठा आणि लोककल्याणाच्या भावनेतून अखंड प्रेरणा मिळत राहील. बुलढाणा जिल्ह्याच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात या निमित्ताने एका नव्या अध्यायाची सुरुवात झाली असून, हे महाविद्यालय भविष्यात केवळ एक शिक्षण केंद्र न राहता जनसेवेचे प्रेरणास्थान म्हणून जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीत मोलाचे योगदान देईल.

## विझलो आज जरी मी, हा माझा अंत नाही : आमदार संजय केनेकर



**मुंबई :** भाजपने विधानपरिषदेच्या ६ जागांसाठी उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यात प्रज्ञा सातव वगळता इतर ५ जागांवर नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू मानल्या जाणाऱ्या आमदार संजय केनेकर यांचा पत्ता कट झाला आहे. संजय केनेकर यांनी या प्रकरणी कवीवर्य सुरेश भट यांच्या कवितेचा दाखला देत हा आपला पराभव नसल्याचे स्पष्ट करत आपल्या पुनरागमनाचे संकेत दिलेत.

महाराष्ट्र विधानसभेच्या १० जागांसाठी येत्या १२ मे रोजी निवडणूक होणार आहे. भाजपने यापैकी आपल्या वाट्याला येणाऱ्या ६ जागांवर नव्या चेहऱ्यांना संधी देत यावेळीही धक्कातंत्र वापरले. यात सुनील विनायक कर्जतकर, माधवी नाईक, संजय नत्थूजी भेंडे, विवेक बिपिनदादा कोल्हे व प्रमोद शांताराम जठार यांचा समावेश आहे. याशिवाय प्रज्ञा सातव यांनाही भाजपने उमेदवारी दिली आहे. यामुळे संजय केनेकर यांच्यासह विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाचा कार्यकाळ संपणाऱ्या कोणत्याही आमदाराला पुन्हा संधी मिळाली नाही. यामुळे हे आमदार नाराज असल्याची माहिती आहे.

संजय केनेकर यांना उमेदवारीची अपेक्षा होती. पण त्यांच्याही नावाचा फेरविचार करण्यात आला नाही. यामुळे संजय केनेकर यांनी कवीवर्य सुरेश भट यांच्या कवितेचा दाखला देत आपल्या भावना व्यक्त करत आपल्या पुनरागमनाचे संकेत दिलेत. विझलो आज जरी मी, हा माझा अंत नाही.

पेटेन उद्या नव्याने, हे सामर्थ नाशवंत नाही. छाटले जरी पंख माझे, पुन्हा उडेन मी. अडवू शकेल मला, अजून अशी भिंत नाही. माझी झोपडी जाळण्याचे, केलेत कैक कावे. जळेल झोपडी अशी, आग ती ज्वलंत नाही, अशी भावना संजय केनेकर यांनी या प्रकरणी व्यक्त केली.

## अंबादास दानवेंना विधानपरिषदेची उमेदवारी : 'आमदारकी, खासदारकी आपल्यावरून १०० वेळा कुर्बान', सुषमा अंधारेंची प्रतिक्रिया



**मुंबई :** विधानपरिषद निवडणुकांसाठी उमेदवारांची घोषणा सध्या केली जात आहे. यात भाजपने प्रज्ञा सातव यांच्यासह ६ नावे जाहीर केली आहेत. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने देखील आपल्या उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी घ्यावी, अशी मागणी काँग्रेससह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून केली जात होती. मात्र शेवटच्या क्षणी उद्धव ठाकरेंनी अंबादास दानवे यांचे नाव जाहीर केले. यात सुषमा अंधारे यांचे देखील नाव आघाडीवर होते, मात्र, त्यांना संधी देण्यात आली नाही. यावर अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

आमदारकी, खासदारकी आपल्यावरून १०० वेळा कुर्बान, असे म्हणत सुषमा अंधारे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. उद्धव ठाकरे यांच्यासोबतचा फोटो शेअर करत, उद्धव ठाकरे यांच्याशी असलेले नातेच आपल्यासाठी सर्वस्व असल्याचे त्यांनी पोस्टमधून सूचित केले आहे. सुषमा अंधारे यांनी उद्धव ठाकरेंना राखी बांधतानाचा व्हिडिओ शेअर केला आहे.

भाजपने ६ उमेदवारांची घोषणा केल्यानंतर महाविकास आघाडीसह सत्ताधारी शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवारांबाबत उत्सुकता शिगेला पोहोचलेली असतानाच, उद्धव ठाकरेंनी अंबादास दानवे यांना पुन्हा एकदा संधी देत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या जागेसाठी सुषमा अंधारे यांचे नाव शर्यतीत होते आणि त्यांच्या 'मातोश्री'वरील नुकत्याच झालेल्या भेटीमुळे त्यांच्या उमेदवारीची दाट शक्यता वर्तवण्यात येत होती, मात्र अखेर ठाकरेंनी दानवेंच्या अनुभवावर विश्वास दाखवला. या राजकीय घडामोडीनंतर सुषमा अंधारे यांनीही मोठ्या मनाने या निर्णयाचे स्वागत करत एका ओळीत आणि व्हिडिओच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

दरम्यान, उद्धव ठाकरेंनी अंबादास दानवे यांची उमेदवारी जाहीर केल्यामुळे महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडली असून, या निर्णयावर काँग्रेस पक्षश्रेष्ठी कमालीचे नाराज असल्याचे समजते. या नाराजीतूनच आता काँग्रेस विधान परिषदेसाठी आपला स्वतंत्र उमेदवार रिंगणात उतरवण्याच्या तयारीत असून, त्याबाबतच्या हालचालींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ सध्या दिल्लीत असून, पक्षश्रेष्ठींशी सविस्तर चर्चा केल्यानंतर लवकरच उमेदवाराच्या नावाची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० एप्रिल २०२६


## सुखना नदीच्या पुनरुज्जीवनासाठी २ मे रोजी चिकलठाण्यात महत्त्वपूर्ण बैठक

**छत्रपती संभाजीनगर :** सुखना नदी बचाओ जनआंदोलन संघर्ष समितीच्या वतीने सुखना नदीच्या पुनरुज्जीवन व संवर्धन आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी शनिवार, दि. २ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. चिकलठाणा येथील काळे बंधू हॉटेलमध्ये ही बैठक होणार आहे.कोलठाण येथील उगमापासून साडेसावंगी येथील संगमापर्यंत ४५ किमी लांबीच्या सुखना नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कृती आराखडा तयार करणे हा बैठकीचा मुख्य उद्देश आहे. चिकलठाण्यात सध्या काम सुरू असून आता संपूर्ण नदीपात्रासाठी एकत्र येण्याचे आवाहन समितीचे अध्यक्ष अशोकराव काळे यांनी केले आहे. या बैठकीत महाराष्ट्र शासनाचा चित्ते नदी पुनरुज्जीवन जल संवर्धन पुरस्कार प्राप्त मा. नरहरी शिवपुरे आणि मनपा नगरसेवक मा. शिवाजीराव दांडगे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. बैठकीला सकाळी १० वाजता सुरुवात होणार आहे. समितीचे अध्यक्ष अशोकराव काळे प्रास्ताविक करतील. पुढील आंदोलनाची दिशा व कृती कार्यक्रम यावर समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे मार्गदर्शन करतील. सुखना नदीची सद्यस्थिती, गावनिहाय समस्या, उगम संरक्षण, गाळ उपसा, अवैध वाळू उपसा, विविध उपक्रम यावर सविस्तर चर्चा होऊन ठराव मंजूर केले जातील. शासनास सुखना नदीच्या विकास कामाचा सविस्तर अहवाल सादर करण्यात येणार आहे त्यावरही चर्चा होईल.

सर्व नदीकाठच्या गावातील नागरिक, पर्यावरणप्रेमी व कार्यकर्त्यांनी तसेच समितीच्या पदाधिकाऱ्यांनी या बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष अशोकराव काळे व समिती तर्फे करण्यात आले आहे.

## जिंतूररात गो सन्मान आव्हाण यात्रेस उत्तम प्रतिसाद



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** देशात गोवंश हत्या बंदी गुणसंवर्धन आणि गोमातेला राष्ट्रवादीचा दर्जा मिळावा या मागणीसाठी दिनांक २७ एप्रिल रोजी गो सन्मान आव्हान अभियान अंतर्गत जिंतूर येथे तहसीलदार यांना गो संवरक्षणार्थ निवेदन देण्यात आले.कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील श्री डोंगरेश्वर व सेवा धाम येथे नंदिनी व मातेचे पुजन करून व आरती करून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणापासून व गोशाळेपासून तहसील कार्यालयापर्यंत भव्य यात्रा काढण्यात आली यामध्ये प.पु. स्वामी महेशनंदजी पुरी महाराज, प.पु. स्वामी किशोरजी महाराज, प.पु. तुलसी रामजी महाराज, पं. प्रशांतजी शर्मा महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

## मुरूम येथील डॉ आंबेडकर वाचनालयाच्या प्रेरणेतून भीमनगरने साधली प्रगती ; घडले उच्चपदस्थ अधिकारी






**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** संविधानाचे शिल्पकार, थोर समाजसुधारक आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आज जगभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे.बाबासाहेबांनी अस्पृश्यता निवारण,दलित हक्क,महिला सक्षमीकरण आणि कामगारांच्या कल्याणासाठी संपूर्ण हयात घालवली.शिक्षण,समता आणि बंधुत्वाचा पुरस्कार करत मागास समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ऐतिहासिक लढा देत वंचित,शोषित समाजाला सन्मानाने जगण्याची प्रेरणा दिली.बाबासाहेबांच्या पश्चात त्यांच्या नावाने देशभरात अनेक संस्था उभ्या राहिल्या मात्र बाबासाहेब हयात असतानाच १९५५ साली मुरूम शहरातील भीमनगर भागात बाबासाहेबांच्या नावाने पाहिले सार्वजनिक वाचनालय सुरू करण्यात आले."शिक्षण हे वघिणीचे दूध आहे, जो पितो तो गुरगुरल्या शिवाय राहत नाही" असे बाबासाहेब नेहमी म्हणत.याच प्रेरणेने बाबासाहेबांच्या हयातीत त्यांच्या नावाने सुरू झालेले महाराष्ट्रातील हे पाहिले वाचनालय असावे.आज या वाचनालयाच्या माध्यमातून अनेक युवकांनी उच्च पदस्थ अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवल्याने डॉ बाबासाहेब आंबेडकर शहर वाचनालय तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. मुरूम शहरातील भीमनगर या छोट्या दलित वस्तीने अनेक उच्चपदस्थ अधिकारी दिले आहेत.येथील तरुणांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या माध्यमातून वैद्यकीय,शैक्षणिक,इंजिनिअरिंग,पोलीस प्रशासन यासह गावपातळीपासून ते मंत्रालयापर्यंत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.या वाचनालयाच्या प्रेरणेतूनच मुरूमचे सुपुत्र लक्ष्मीकांत देशमुख यांनी २०१८ साली बडोदे येथे पार पडलेल्या ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले आहे. पूर्वीच्या काळात गाव खेड्यातील दलित बहुल भागाकडे बघण्याचा एक नकारात्मक दृष्टीकोन होता.आता यामध्ये मोठा बदल झाला आहे.शिक्षणाचे महत्त्व ओळखून येथील तरुण मर्यादित साधनसामग्री,आर्थिक अडचण आणि सामाजिक प्रतिमा यावर मात करत डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या माध्यमातून जिद्दीने आणि चिकाटीने स्पर्धा परीक्षांची तयारी करून यश संपादन करत प्रशासकीय सेवेत उतुंग भरारी घेत आहेत.भीमनगर वस्तीतील क्लास वन,क्लास टू अधिकाऱ्यांसह डॉक्टर, इंजिनिअर,प्राध्यापक, वकील, शिक्षक अशा वर्गाची आकडेवारी पाहता नकारात्मक प्रतिमा झुगारून शिक्षणाच्या जोरावर प्रगती साधता येते याचे जिवंत उदाहरण म्हणावे लागेल.यामुळेच उमरगा तालुक्यातील न्हवे तर धाराशिव जिल्ह्यातील इतर कोणत्याही शहर आणि खेड्यातील दलित वस्त्यांपेक्षा मुरूम शहरातील भीमनगर शिक्षित आणि प्रगत म्हणून ओळखले जात आहे.या वस्तीने एक वेगळा ठसा उमटवला असून मुरूमच्या भीमनगरची ही यशोगाथा तालुक्यातील आणि जिल्ह्यातील विशेष करून दलित समाजातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. चौकट १पिंपळे गुरुजींनी सुरू केली शैक्षणिक चळवळ स्वातंत्र्य काळात नांदेड जिल्ह्यातील गणपतराव पिंपळे गुरुजी हे मुरूम शहरातील एका शाळेत मुख्याध्यापक म्हणून रूजू झाले होते.गुरुजींनी भीमनगर भागात मोठ्या पोटतिडकीने शिक्षणाचा प्रसार सुरू केला.शाळा सुटल्यानंतर गुरुजी वृत्तपत्रे घेऊन लहान मुलां बरोबरच जेष्ठांना एकत्र करत पारावर बसून त्यांच्यासमोर पेपर वाचन करत.रेडिओवरून प्रसारित होणाऱ्या बातम्यांच्या माध्यमातून देश आणि राष्ट्रीय पातळीवरील घडामोडींची विस्तृत माहिती सांगत शिक्षणाचे महत्त्व पटवून देत.पिंपळे गुरुजींनी खऱ्या अर्थाने भीमनगर भागात शिक्षणाचा प्रसार सुरू केला.त्यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या डॉ आंबेडकर वाचनालयाच्या माध्यमातून येथील तरुणांनी मोठी प्रगती साधली आहे.चौकट २डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालय सुरू करण्यात यांचे योगदान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन समाजाला शिक्षित आणि प्रगत करण्यासाठी पिंपळे गुरुजींच्या मार्गदर्शनाने भीमनगर येथील लाडप्पा सायबा गायकवाड,मारुती सायबा गायकवाड,एकनाथ महाराज,पांडुरंग भालेराव,शिवदास गायकवाड, गणपती लिंबाजी कांबळे,खंडू कांबळे यांनी एका लहान झोपडीवजा खोलीत १९५५ साली बाबासाहेबांच्या हयातीतच डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय सुरू केले.मुरूमचे सुपुत्र माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यांच्या प्रयत्नातून आता वाचनालयाची भव्य अशी दुमजली इमारत उभी राहिली आहे.यापुढील काळातही स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांना या वाचनालयाचा मोठा फायदा होणार आहे.चौकट ३वाचनालयाच्या माध्यमातून घडले वर्ग एकचे १३,वर्ग दोनचे ३४ अधिकारी वाचनालयाच्या माध्यमातून भीमनगर मधून वर्ग १ चे १३ तर वर्ग २ चे ३४ अधिकारी यासह ६० इंजिनिअर,१६ डॉक्टर याबरोबरच प्राध्यापक,शिक्षक,वकील तयार झाले आहेत.यामध्ये निवृत्त साखर सहसंचालक डी आय गायकवाड,राजस्थान राज्यपालांचे ओएसडी राजकुमार सागर,अप्पर निबंधक राजेश सुरवसे,पोलीस उपायुक्त विजयकांत सागर,उपजिल्हाधिकारी राहुल गायकवाड,विक्रीकर उपायुक्त सुमेधकुमार गायकवाड,कार्यकारी अभियंता अण्णाराव कांबळे,बीपीसीएलचे चीफ मॅनेजर सिद्धेश्वर भालेराव,ऑर्थोपेडिक सर्जन डॉ प्रशांत कांबळे असे विविध पदावर कार्यरत असलेले अधिकारी आहेत.चौकट ४अधिकाऱ्यांकडून मिळत आहे मार्गदर्शन डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाच्या प्रेरणेने भीमनगर येथील दत्तात्रय गायकवाड हे पाहिले अधिकारी झाले.त्यांच्या यशाने युवकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.आणि येथूनच खऱ्या अर्थाने भीमनगरची प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली.आज विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या तसेच निवृत्त झालेल्या मंडळींकडून नौकरीच्या संधी,स्पर्धा परिक्षेबाबत योग्य मार्गदर्शन मिळत असल्याने येथील युवकांत स्पर्धा परीक्षांची गोडी निर्माण झाली आहे.वाचनालयाच्या माध्यमातून येथील प्रत्येक घरातील युवक उज्वल भविष्यासाठी प्रयत्न करत असल्याने भीमनगर स्पर्धा परीक्षांचे केंद्र बनत आहे.कठीण परिस्थितीतुन शिक्षण घेत मी पहिला अधिकारी झालो.यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे खूप मोठे योगदान आहे.माझ्या यशाने सहकाऱ्यांना प्रेरणा मिळाली आणि तेही विविध शासकीय खात्यात रूजू झाले.आज या यशाने प्रेरित होऊन भीमनगर येथील युवक स्पर्धा परीक्षांकडे वळत आहेत हीच माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. - डी आय गायकवाड (निवृत्त साखर सह संचालक)शिक्षणाचे महत्त्व ओळखून गणपतराव पिंपळे गुरुजींच्या मार्गदर्शनाने भीमनगर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालय सुरू झाले.यामुळे अनेक अधिकारी घडल्याने आज भीमनगरने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.वाचनालयामुळे तसेच अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने येथील युवक स्पर्धा परीक्षेत यश मिळवत आहेत. मदन गायकवाड (निवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी)माझ्या जडणघडणीत डॉ बाबासाहेब आंबेडकर शहर वाचनालयाचा बहुमूल्य वाटा आहे.माझ्या उत्कर्षाच्या प्रवासाचा साक्षीदार म्हणजे हे वाचनालय आहे. दररोज शाळा सुटल्यानंतर वाचनालयातील वृत्तपत्रे वाचणे आणि घरी वाचनासाठी पुस्तके घेऊन जाणे हा माझ्या त्यावेळच्या दैनंदिन जीवनातील अपरिहार्य भाग बनला होता. - राहुल गायकवाड (उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी)मी १९६५ ते ७० ला धाराशिव येथे राहत होतो.शेती मुरूम येथे असल्याने उन्हाळ्यात सुट्टी घालवण्यासाठी मुरूम गावी येत होतो.

त्यावेळी मी वाचनालयात जाऊन पुस्तके वाचायचो.सुरुवातीला कादंबऱ्या वाचल्या त्यानंतर वैचारिक साहित्य वाचले.त्या काळात वाचनालयात खूप चांगली वैचारिक पुस्तके होती.त्या वाचनातून माझी सामाजिक जाणिव विस्तारली आणि माझ्या लेखणीला अंकुर फुटला.नंतरच्या काळात नांदेड,धाराशिव येथील वाचनालयातील पुस्तके वाचली.पण खऱ्या अर्थाने माझ्या साहित्यिक होण्याचे श्रेय मुरूम येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर शहर वाचनालयाला आहे. - लक्ष्मीकांत देशमुख (माजी अध्यक्ष अ भा म सा स बडोदा)

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० एप्रिल २०२६


## उष्माघाताला टाळू

सुरू झाला उन्हाळा
मुलांनो बाहेर नका खेळू
योग्य खबरदारी घेवून
आपण उष्माघाताला टाळू

तहान लागली की
भरपूर पाणी पिऊ
टरबूज खरबूज
दुपारच्या वेळी खाऊ

अधूनमधून घेऊ ताक
कधी शहाळ्याचे पाणी
नको तेलकट खाणे
आरोग्याची होईल हानी

योग्य वेळी बाहेर जातांना
टोपी घालू डोक्यावर
अंगात सुती पांढरे कपडे
काळा चष्मा लावू डोळ्यावर

दुपारच्या वेळी
बाहेर जाणे टाळू
वडीलधाऱ्या मंडळींची
आज्ञा आपण पाळू



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## गर्व कशाचा करतो भाऊ ?

माणसाच्या जन्माला येऊन,
जग थोडे समजून घ्यावे.
आपल्या सोबत इतरांना,
जगण्यासाठी आनंद द्यावे. 1

माझं माझं करून सदैव,
हातातले सुख गमावतो.
कधी कामी पडणार नाही,
अशी संपत्ती का कमावतो. 2
पैसा अडका संपत्ती सारे,
इथेच राहून जाते भाऊ.
माणूस होऊन जगतांना,
सदा आनंदाचे गीत गाऊ. 3

रिकाम्या हातीच आला होता,
रिकाम्या हातीच तू जाणार.
कशाला जमा करतो पैसा,
मुलंबाळं वाटून खाणार. 4

गर्व कशाचा करतो भाऊ,
शेवटी जातांना खांदे चार.
तेही माहित नाही कोणाचे,
ईश्वर देतोचं मुका मार. 5



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## लोकसेवा हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांचा जिल्हाधिकाऱ्याकडून गौरव



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** महाराष्ट्रात नागरिकांना शासकीय सेवा पारदर्शक, गतिमान व निश्चित कालमर्यादेत मिळाव्यात या उद्देशाने लागू करण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल उपविभागीय अधिकारी श्री. शैलेश लाहोटी यांचा माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला आहे.उपविभागीय अधिकारी म्हणून श्री. लाहोटी यांच्या कार्यक्षेत्रात सेलू आणि जिंतूर या दोन महत्त्वाच्या तालुक्यांचा समावेश आहे. विशेषतः जिंतूर तालुका हा परभणी जिल्हा मधील सर्वात विस्तृत व कामकाजाच्या दृष्टीने आव्हानात्मक तालुक्यांपैकी एक मानला जातो. मोठा भौगोलिक विस्तार, विविध प्रशासकीय कामांचा मोठा व्याप आणि नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा या सर्व बाबींचा प्रभावीपणे सामना करत त्यांनी प्रशासनाची गती कायम ठेवली आहे.श्री. लाहोटी यांनी लोकसेवा हक्क कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करत नागरिकांना विहित मुदतीत सेवा मिळाव्यात यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे नागरिकांना विविध शासकीय सेवा सुलभ, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळू लागल्या आहेत. परिणामी, प्रशासनावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.सत्कार सोहळ्यात जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक करताना सांगितले की, "लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही प्रशासनाच्या विश्वासार्हतेची पायाभूत गरज आहे. श्री. लाहोटी यांचे कार्य इतर अधिकाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे."या गौरवामुळे प्रशासनातील सकारात्मक कार्यपद्धतीला चालना मिळणार असून नागरिकाभिमुख सेवा देण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. उपविभागीय अधिकारी श्री. शैलेश लाहोटी यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

## आदर्श प्राध्यापक, प्रेरणादायी व्यक्तिमत्व... प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले



आदरणीय प्रा. डॉ. सुधीर वैजनाथराव पंचगल्ले हे ज्ञान, शिस्त, कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या निःस्वार्थ समर्पणाचे तेजस्वी प्रतीक म्हणून शैक्षणिक विश्वात सदैव आदराने आणि अभिमानाने स्मरणात राहतील. मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात वाणिज्य शाखेत त्यांनी दिलेली प्रदीर्घ, समर्पित आणि निष्ठापूर्ण सेवा ही केवळ अध्यापनापुरती मर्यादित राहिली नाही, तर ती असंख्य विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारी, त्यांच्या विचारांना व्यापकता देणारी, त्यांचे व्यक्तिमत्व घडविणारी आणि त्यांना यशाच्या शिखरावर पोहोचविणारी ठरली आहे. त्यांच्या प्रत्येक व्याख्यानामध्ये केवळ विषयाचे ज्ञान नसून त्यामध्ये जीवनाचा अनुभव, मूल्यांची शिकवण आणि यशस्वी आयुष्याची दिशा दडलेली असते. त्यांच्या अध्यापनशैलीत असलेली सखोलता, विषयातील विलक्षण प्रभुत्व, अत्यंत सोप्या, सुबोध आणि प्रभावी भाषेत मांडणी करण्याची हातोटी, तसेच दैनंदिन जीवनातील उदाहरणांच्या माध्यमातून अगदी गुंतागुंतीच्या संकल्पनाही सहज आणि स्पष्टपणे समजावून सांगण्याची त्यांची अद्वितीय क्षमता विद्यार्थ्यांना नेहमीच आकर्षित करत आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी शिक्षण ही केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्याची प्रक्रिया न राहता, ती एक आनंददायी, सर्जनशील आणि प्रेरणादायी प्रवास ठरला आहे.डॉ. पंचगल्ले सर यांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान देण्यावर भर दिला नाही, तर त्यांनी विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना दिली, त्यांना प्रश्न विचारण्याची सवय लावली, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित केली आणि जीवनातील विविध आव्हानांना धैर्याने व आत्मविश्वासाने सामोरे जाण्याची मानसिक तयारी करून दिली. त्यांनी नेहमीच " शिक्षण हे केवळ माहिती देणे नाही, तर व्यक्तिमत्व घडविण्याची प्रक्रिया आहे." या तत्वावर काम केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या यशस्वी झाले नाहीत, तर ते सामाजिकदृष्ट्याही जबाबदार, सजग आणि मूल्यनिष्ठ नागरिक म्हणून घडले. त्यांच्या शिकवणीचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या आयुष्यभर जाणवतो, कारण त्यांनी दिलेले ज्ञान हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसून ते जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर उपयोगी पडणारे आहे.डॉ. पंचगल्ले सर हे एक उत्कृष्ट प्राध्यापक असण्याबरोबरच एक समर्पित संशोधक, अभ्यासू वृत्ती आणि दूरदृष्टी असलेले मार्गदर्शक आहेत. एम.एस.एम.ई. क्षेत्राचा विकास, भारतीय अर्थव्यवस्थेतील बदल, बेरोजगारीची गंभीर समस्या, बौद्धिक संपदा हक्क (IPR) यांचे महत्त्व, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रावर होणारा प्रभाव अशा विविध समकालीन व महत्त्वपूर्ण विषयांवर त्यांनी केलेले संशोधन अत्यंत सखोल, वास्तववादी आणि समाजाभिमुख आहे. त्यांच्या संशोधन कार्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान मिळाले नाही, तर त्यांना प्रत्यक्ष जीवनातील आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक वास्तव समजून घेण्याची सखोल दृष्टी प्राप्त झाली. त्यांनी राष्ट्रीय व राज्यस्तरीय परिसंवाद, कार्यशाळा आणि चर्चासत्रांमध्ये सक्रिय सहभाग घेत आपल्या ज्ञानाचा ठसा उमटवला आणि महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवी उंची प्राप्त करून दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. उच्च शिक्षणाच्या दिशेने वाटचाल केली आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत साधे, नम्र, संयमी, सहकार्यशील आणि प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, त्यांच्या समस्या संयमाने ऐकून त्यावर उपाय सुचवणे, तसेच त्यांना आत्मविश्वास देऊन पुढे जाण्यास प्रेरित करणे, ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. विद्यार्थ्यांसाठी ते नेहमीच सहज उपलब्ध असणारे, त्यांच्या शंका निरसन करणारे आणि त्यांना योग्य दिशा दाखवणारे मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या व्यक्तिमत्वात एक वेगळीच आत्मीयता आहे, ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थी त्यांच्याशी सहजपणे संवाद साधू शकतो. सहकारी प्राध्यापकांमध्येही ते समन्वय साधणारे, सकारात्मक विचारांचे, नेतृत्वगुणांनी परिपूर्ण आणि संघभावना जोपासणारे व्यक्तिमत्व म्हणून अत्यंत आदराने पाहिले जाते.महाविद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि विविध सहशालेय उपक्रमांमध्ये त्यांनी दिलेला सक्रिय सहभाग आणि योगदान हे संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत मोलाचे ठरले आहे. त्यांनी नेहमीच शिक्षणाला मूल्याधिष्ठित बनविण्याचा प्रयत्न केला आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, कर्तव्यभावना, सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम आणि नैतिक मूल्ये रुजविण्याचे कार्य केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे महाविद्यालयात एक सकारात्मक, प्रेरणादायी आणि सर्जनशील वातावरण निर्माण झाले, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरले.आज त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने आपण एका विलक्षण, कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी प्राध्यापकाला औपचारिक निरोप देत आहोत, परंतु त्यांच्या कार्याचा, विचारांचा, मूल्यांचा आणि त्यांनी दिलेल्या संस्कारांचा ठेवा हा कायमस्वरूपी आपल्या सोबत राहणार आहे. त्यांनी घडविलेले विद्यार्थी आज समाजाच्या विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असून त्यांच्या शिकवणीचा प्रसार करत आहेत आणि त्यांच्या कार्याचा अमूल्य वारसा पुढे नेत आहेत. हेच त्यांच्या आयुष्यभराच्या परिश्रमाचे खरे फलित आहे. त्यांच्या कार्यामुळे केवळ विद्यार्थ्यांचेच नव्हे, तर समाजासाठी देखील सहकार्य लाभले आहे, ही बाब अत्यंत अभिमानास्पद आहे.त्यांच्या आयुष्यातील हा नवा अध्याय आनंद, समाधान, उत्तम आरोग्य, समृद्धी आणि नव्या संधींनी परिपूर्ण होवो , अशी मनोकामना ! त्यांनी पुढील आयुष्यातही आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ समाजाला देत राहावे, हीच अपेक्षा. त्यांनी केलेले कार्य हे केवळ एका प्राध्यापकाचे कार्य नसून, ते एक प्रेरणादायी जीवनप्रवास आहे. जो पुढील अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरेल. म्हणूनच, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले हे नाव सदैव आदराने, अभिमानाने, कृतज्ञतेने आणि प्रेरणेने उच्चारले जाईल.



**प्रा. डॉ. प्रकाश रतनलाल रोडीया**
सहयोगी प्राध्यापक वाणिज्य विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० एप्रिल २०२६


## मंत्रालयात शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर महत्त्वपूर्ण बैठक; तातडीने कार्यवाहीचे निर्देश



**कन्नड (अरुण थोरात) :** राज्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत शालेय शिक्षण विभागाच्या स्तरावर मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. राज्याचे राज्यमंत्री (शालेय शिक्षण) डॉ. पंकज भाऊ भोयर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालन क्रमांक २४१ येथे ही बैठक आयोजित करण्यात आली.या बैठकीस महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांच्यासह राज्य कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील, राजन कोरगांवकर उपस्थित होते. तसेच शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार मनीषाताई कायंदे, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, भाजपा शिक्षक आघाडीचे पदाधिकारी तसेच महाराष्ट्र मुख्याध्यापक महामंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.बैठकीत शिक्षक समितीच्या वतीने अनेक ज्वलंत प्रश्न मांडण्यात आले. यामध्ये १५ मार्च २०२४ चा संचमान्यता शासन निर्णय रद्द करण्याची मागणी, TET व शिक्षण सेवक मानधन प्रश्न, उन्हाळी सुट्टीतील विविध प्रशिक्षण कार्यक्रम रद्द करणे, न्यायालयाच्या आदेशानुसार विदर्भातील शाळा सुरू करणे, जनगणना काम करणाऱ्या शिक्षकांना अर्जित रजा देणे, अनावश्यक ऑनलाइन-ऑफलाइन शैक्षणिक कामे बंद करणे, वेतन त्रुटी दूर करणे, वस्ती शाळा शिक्षकांना सेवाविषयक लाभ देणे, नपा-मनपा शिक्षकांसाठी स्वतंत्र वेतन पथक स्थापन करणे, विद्यार्थ्यांना डेस्क-बेंच व स्वाध्याय पुस्तिका उपलब्ध करून देणे, तसेच १०-२०-३० सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे आदी मागण्यांचा समावेश होता.राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी बैठकीत मांडण्यात आलेल्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. संचमान्यता शासन निर्णयातील त्रुटी दूर करून आवश्यक सुधारणा करण्यासाठी त्वरित पावले उचलावीत, तसेच उन्हाळी सुट्टीतील प्रशिक्षणांबाबत योग्य निर्णय घ्यावा, असे आदेश देण्यात आले.तसेच इतर प्रलंबित विषयांबाबत यापूर्वी झालेल्या चर्चेचा संदर्भ घेऊन दादाजी भुसे यांच्याकडे अनुकूल प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही संबंधित विभागाला देण्यात आले.या बैठकीमुळे राज्यातील शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक तोडगा निघण्याची आशा शिक्षक समितीचे मराठवाडा विभागीय प्रसिध्दीप्रमुख सतीश कोळी यांनी आमच्या प्रतिनिधीकडे व्यक्त केली आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष विजय साळकर, सचिव रंजित राठोड, राज्यप्रवक्ते नितीन नवले मराठवाडा अध्यक्ष शामभाऊ राजपूत, मराठवाडा पदाधिकारी रऊफ पठाण, अशोक डोळस, प्रवीण गायकवाड, दिपिका एरंडे, प्रिती जाधव आदी उपस्थित होते.

## मराठवाडा शिक्षक संघाच्या उपोषणाला यश शिक्षण संचालकाचे चौकशीचे आदेश




**छत्रपती संभाजीनगर :** प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेच्या राजे शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयात अनेक अनियमितता व शिक्षकांवरील आर्थिक मानसिक त्रासाविरुद्ध विरुद्ध मराठवाडा शिक्षकसंघाने आंदोलने केली आहेत अनियमितता जसे माहिती अधिकार २००५ चे उल्लंघन, शिक्षकांची बेकायदेशीर बडतर्फी,बनावट स्वाक्षरी,१) चौकशी आणि अहवाल सादर करणे: श्री. कादरी सनाउल्लाह आणि श्रीमती अनिता बोबडे यांच्या बोगस वैयक्तिक मान्यताप्रकरणाची सुनावणी अध्यक्ष, विभागीय शिक्षण मंडळ, छ. संभाजीगनर यांचे दालनात एप्रिल २०२५ मध्ये झाली होतो. मात्र, तक्रारदारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेशी संधी न देता ७ जुलै २०२५ रोजी एकतर्फी निर्णय देण्यात आला. याविरोधात १८ आणि २१ जुलै २०२५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, छ. संभाजीनगर व संचालनालयास तक्रार आणि अपील दाखल करण्यात आले आहे.२) आरक्षण धोरणाचे उल्लंघन: संस्थेच्या बिंदू नामावलीनुसार १५७ पैकी १३६ भरलेल्या पदांमध्ये खुल्या प्रवर्गातील ५ पदे अतिरिक्त भरली असून आरक्षण धोरणाची पायमल्ली केली आहे.३) बोगस नियुक्त्या : संस्थेने २०१८ नंतर १५ ते २० लाख रुपये घेऊन अनेक शिक्षकांच्या 'बेंकडेटेड' नियुक्त्या केल्या आहेत. यात शैक्षणिक अर्हता नसतानाही कागदपत्रांची अफरातफर करून मान्यता मिळवल्याचे आरोप आहेत.४) प्रशासक नेमण्याची शिफारस : माहिती अधिकार कायद्याचा वारंवार भंग केल्यामुळे आणि उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन न केल्यामुळे, शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांनी २४ ऑक्टोबर २०२४ रोजी या शाळेवर प्रशासक नेमण्याधो शिफारस केली आहे.५) आर्थिक भ्रष्टाचार : संस्थेने शिक्षकांचे वेतन परस्पर स्वतःच्या खात्यावर वळवणे, विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य शुल्क वसूल करणे आणि नोकरीचे आमिष दाखवून तरुणांकडून पैसे उकळणे असे गंभीर प्रकार केल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत.या बाबतीत न्याय मागण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजीनगर यांनी भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वात आमरण उपोषण सुरू केले डॉ पद्माकर पगार अनिता चौधरी सविता हिंगे यांनी उपोषण केले मा शिक्षण संचालक पुणे यांनी सर्व मागण्या मान्य करत उच्चस्थरीय चौकशी करण्याचे मा विभागीय अध्यक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ लातूर यांना दिले यावेळी मराठवाडा शिक्षक संघाचे भाई चंद्रकांत चव्हाण जिल्हा सचिव मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजी नगर नवनाथ मंत्री अशोक ढमढेरे विनोद केणेकर कृष्णा गोंडे विलास चव्हाण सोनाली गव्हाणे रेखा साकळेस्वाती बोंडे हे उपस्थित होते.

पीडित शिक्षक 1) रामेश्वर गोराडे 2) रवींद्र मगर 3) संभाजी जाधव 4) सचिन मुसळे 5) सागर सूर्यवंशी 6) अजित जाधव 7) रावसाहेब बोरसेहे उपस्थित होते.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस


डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० एप्रिल २०२६

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य



दि. ३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्रामविकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. परंतु या परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट त्यांच्यातील संवेदनशीलता, करुणा आणि समाजाविषयीची बांधिलकी अधिकच दृढ झाली. लहान वयातच त्यांना अध्यात्मिक ओढ निर्माण झाली आणि संतपरंपरेतील मूल्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्यांच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आध्यात्मिक साधना केली आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला एक स्पष्ट दिशा मिळाली.तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये लोकभाषेचा वापर असल्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजत. त्यांनी लोकांच्या मनातील अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धतीचा अवलंब केला. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये यांचा सखोल विचार त्यांनी ग्रामगीतेमध्ये मांडला आहे. त्यांच्या मते, गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास. त्यामुळे प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.स्वातंत्र्यानंतरही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांनी लोकांना स्वावलंबन, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना संघटित करून विकासाच्या कार्यात सहभागी केले. स्वच्छतेबाबत त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना रुजवली. त्यांनी स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कृतीतून त्यांनी समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. बदल घडवायचा असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी लागते. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि स्वच्छतेला सामाजिक जबाबदारीचे रूप दिले.तुकडोजी महाराजांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी नैतिक शिक्षणावर भर दिला आणि समाजात मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट आग्रह दिसून येतो. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी समाजातील स्त्रियांना समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांविषयी सकारात्मक बदल घडून आले.तुकडोजी महाराजांचे विचार हे अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक होते. त्यांनी धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार मांडला. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा मूलभूत संदेश एकच आहे तो म्हणजे मानवतेची सेवा होय. त्यांनी समाजात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती भौतिकता, सामाजिक असमानता, पर्यावरणीय समस्या आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल. ही विचारधारा आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.तुकडोजी महाराजांनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला एक वेगळा अर्थ दिला. त्यांनी ग्रामस्वराज्याला केवळ राजकीय स्वायत्तता म्हणून न पाहता, ते सामाजिक आणि आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक मानले. त्यांनी गावांनी बाह्य अवलंबित्व कमी करून स्वतःच्या संसाधनांचा योग्य वापर करावा, स्थानिक कौशल्यांचा विकास करावा आणि स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करावी, असे प्रतिपादन केले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांचे हे विचार अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या कार्यात युवकांच्या भूमिकेला विशेष स्थान होते. त्यांनी युवकांना समाजपरिवर्तनाचे मुख्य घटक मानले. त्यांनी युवकांना केवळ शिक्षण घेण्यापुरते मर्यादित न राहता, समाजसेवा, राष्ट्रसेवा आणि नैतिक मूल्यांच्या जपणुकीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या कीर्तनांमध्ये आणि प्रवचनांमध्ये युवकांना प्रेरणा देणारे संदेश असत. त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवन, शिस्तबद्ध वर्तन आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिली.तुकडोजी महाराजांनी पर्यावरण संरक्षणालाही अप्रत्यक्षपणे महत्त्व दिले. त्यांनी स्वच्छतेवर, निसर्गाशी सुसंवाद ठेवण्यावर आणि साधेपणाने जीवन जगण्यावर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आग्रह दिसून येतो. आजच्या काळात वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजावर एक सकारात्मक परिणाम घडवून आणला. त्यांनी लोकांना एकत्र आणले, सामाजिक ऐक्य निर्माण केले आणि समाजात बंधुभावाची भावना रुजवली. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांनी आपले जीवन बदलले आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली.भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल केली. ही उपाधी त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आहे. परंतु त्यांच्या खऱ्या महानतेचे मोजमाप त्यांच्या कार्यातून समाजात घडलेल्या परिवर्तनातूनच करता येते. त्यांनी कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता, निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि प्रामाणिकता यांचे अद्वितीय उदाहरण दिसून येते. आजच्या काळात समाज अनेक समस्यांना सामोरे जात आहे. सामाजिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा ऱ्हास. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना तुकडोजी महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा, स्वावलंबनाचा, स्वच्छतेचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. तुकडोजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करताना असे जाणवते की, त्यांनी समाजाला दिलेले संदेश हे केवळ त्या काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहेत. त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश, समतेचा विचार आणि राष्ट्रप्रेमाची भावना आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. त्यांच्या कार्यातून आपण शिकू शकतो की, समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृती आवश्यक असते.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकासासाठी, स्वच्छतेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. आजच्या तरुण पिढीसमोर अनेक संधी आणि आव्हाने आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोपे झाले असले तरी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा परिस्थितीत तुकडोजी महाराजांचे विचार तरुणांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी दिलेला साधेपणाचा, प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.शेवटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन आणि कार्य हे आपल्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करूया, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करूया आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यांच्या ग्रामगीतेतील विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन आपण एक सशक्त, समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी परिपूर्ण समाज निर्माण करू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून, ते वर्तमान आणि भविष्याच्या दिशादर्शनासाठी एक प्रकाशस्तंभ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दृढ संकल्प करूया, हीच खरी कृतज्ञता ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० एप्रिल २०२६


# प्रोफेसर डॉ. सुधीर पंचगल्ले यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रेरणादायी प्रवास



निजाम राजवटीत तालुक्याचे मुख्यालय, कर्नाटक राज्याच्या सीमेवर असलेल्या आणि महाराष्ट्र राज्यातील शेवटचे टोक असलेल्या अतनूर या गावी प्रोफेसर डॉ. सुधीर पंचगल्ले यांचा जन्म मातोश्री सौ. कमलताई (गृहिणी) यांच्या पोटी दि.6 एप्रिल 1966 झाला. अतनूर हे गाव निजाम काळात बिदर जिल्ह्यात होते. या गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी म्हणजे घाळप्पा स्वामी महाराज यांनी दीडशे वर्षापूर्वी जिवंत समाधी घेतल्याने या गावाला ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक वारसा लाभला आहे. हे गाव चहूबाजूंनी बालाघाटच्या डोंगराच्या कुशीत तिरू नदीच्या काठावर वसलेले आहे. या पावन भूमीत सुधीर जन्मले. महाराष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर हे गाव उस्मानाबाद आणि सध्याच्या धाराशिव जिल्ह्यात आहे. सन 1982 ला लातूर जिल्ह्याची निर्मिती होऊन ते लातूर जिल्ह्यात आले. हे गाव सीमेवर वसलेले असल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा नसतानाही सुधीर यांनी आपले शिक्षण पूर्ण करून वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी मिळविली. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत तर माध्यमिक शिक्षण विकास विद्यालयात झाले. पुढे त्यांनी उदगीर येथे वाणिज्य शाखेतून उच्च माध्यमिक व उदयगिरी महाविद्यालयातून पदवी शिक्षण पूर्ण केले. पदव्युत्तर शिक्षण हावगी स्वामी महाविद्यालयातून पूर्ण केले. यावेळी शिक्षण घेत असताना डॉ. नामदेव खंडेगावे सरांच्या सहवासात आल्याने त्यांचा सुधीरवर वैचारिक प्रभाव पडला. सर वर्गात म्हणायचे कांही बनायच असेलतर मन लावून अभ्यास करा, प्राध्यापक व्हा, निश्चित आपणास यश मिळेल. सुधीर यांना त्यांचे म्हणणे पटले. परंतु पुढे काय करायचे हे त्यांनाही माहित नव्हते. त्यांनी सरांची भेट घेऊन सरांना विचारले. सर मी पुढे काय करू ? तेव्हा सरांनी त्यांना एम. फील. करण्याचा सल्ला दिला. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात शिक्षण घेत असताना प्राचार्य डॉ. ना. य. डोळे यांच्या संपर्कात आल्याने वैचारिक बैठक पक्की झाली. प्रा. महादेव गंदीगुडे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयीन शिक्षणात येणाऱ्या अडचणी सहज सुटत गेल्या. त्यांच्या आजवरच्या प्रवासात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. राजाभाऊ गचके, प्रा. रमेश चणगे, प्रा. प्रल्हाद पदातुरे, प्रा. शिवाजीराव साळुंखे यांच्या मार्गदर्शन व सहवासामुळे महाविद्यालयीन शिक्षण व व्यक्तिगत जीवनात त्यांना मोलाचे सहकार्य लाभल्याने त्यामुळे पुढील शैक्षणिक प्रवास सुखकर होण्यास मोठी मदतच झाली. त्यांनी अमरावती विद्यापीठातील शिवाजी महाविद्यालयामध्ये एम. फील. प्रवेश घेण्यासाठी गेले. तिथे माझी आणि सुधीर ची भेट झाली आणि एकाच रूममध्ये राहण्याचा योग आला. सुधीरचे वडील वैजिनाथराव हे जिल्हा परिषदेला शिक्षक असल्यामुळे त्यांची परिस्थिती चांगली होती. त्यांचे वडील म्हणजे नाटककार, वेशभूषाकार, पेन्टर, फोटोग्राफर, वक्ते, अंनिस चे कार्यकर्ते, एक उपक्रमशील आदर्श शिक्षक म्हणून त्यांच्या विचाराचा वसा आणि वारसा पुढे सुधीरने चालू ठेवला. दर महिन्याला त्याला मनी ऑर्डर यायची. मनी ऑर्डरचे पैसे घेतल्यानंतर एक पावती परत गावाकडे पोस्टमॅन स्वाक्षरी करून मागून घ्यायचा. त्यावर एक मेसेज लिहायची पद्धत होती. पोस्टमॅन आमच्या रूमवर आला की, आम्हाला वाटायचे सुधीरची मनी ऑर्डर आली. पोस्टमन पैसे काढून दिल्यानंतर त्यावर मेसेज सुधीर लिहायचा. मी त्याला म्हणायचं बाबा आपण पाठविलेले पैसे मला मिळाले. मी सुखरूप आहे. 25 तारखेपर्यंत अजून चारशे रुपये पाठवा. सुधीर हे अगदी हळव्या स्वभावाचा असल्यामुळे तो आमचा ऐकायचा आणि लागलीच तसेच लिहायचा. वर्षभर नियमित राहून आम्ही एम. फील. चा संशोधन प्रबंध सादर केला. पहिल्याच प्रयत्नात आम्ही दोघेही एम. फील. उत्तीर्ण झालो. सुधीर यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर अध्यापनातून विद्यार्थ्यांना फक्त विषयाचे ज्ञान दिले नाही तर जीवन मूल्यांचेही बाळकडू दिले. वर्गात शिकवताना त्यांचा अभ्यासपूर्ण दृष्टिकोन विद्यार्थ्यांशी नाते, जिव्हाळा आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी तळमळ ही विशेष राहिली. त्यांचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात नावलौकिकास पात्र ठरले आहेत. सुधीर यांनी ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रात जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने पार पाडली. त्यामुळे विद्यार्थी, सहकारी आणि पालक यांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आदर आणि आत्मीयता राहिली. आजपर्यंत त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून जे संस्कार रुजवले ते पुढील पिढ्यांना दिशादर्शक व प्रेरणा देणारे राहतील. सुधीर यांनी आपल्या सेवा काळात प्रा. डॉ. शिवकुमार गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली सन 2016 मध्ये " परफॉर्मन्स इ व्हॅल्युशन ऑफ मार्केट कमिटी इन उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट " या विषयावर पीएच. डी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या पीएच. डी. संशोधन मार्गदर्शक, कुलगुरूंचे प्रतिनिधी, प्राध्यापक पदोन्नती निवड समितीचे विषयतज्ञ, शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षण (AAA), महाविद्यालयीन संलग्नीकरण समितीचे सदस्य म्हणूनही उत्तम कार्य केले. संशोधनाच्या क्षेत्रात देखील देश-विदेश पातळीवर नामांकित संशोधन पत्रिकेत त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत. महाविद्यालयात देखील त्यांनी यु.जी.सी., नॅक, आय.क्यु.ए.सी., अकॅडमी ऑडिट या कामी त्यांचे योगदान राहिले आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य अधिवेशन, परिषद, चर्चासत्र व कार्यशाळेत सक्रिय सहभागी होऊन प्रतिनिधित्व केले. काही राष्ट्रीय, राज्य परिषद व कार्यशाळेचे यशस्वीरीत्या आयोजन केले. रोटरी इंटरनॅशनल, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र पत्रकार संघ या सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी म्हणूनही कार्यरत आहेत. शैक्षणिक व महाविद्यालयीन काम हेच आपले कर्तव्य समजून त्यांनी प्रत्येक जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली. अनेकांच्या सुखदु:खात सहभागी होऊन त्यांनी समाजात माणुसकीचे मूल्य रुजविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर च्या शेवटचे टोक असलेल्या मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात विनाअनुदानित तत्वावर 1 सप्टेंबर 1994 ला प्राध्यापक म्हणून रुजू होऊन अध्यापकाच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला ज्ञानाची धार आणि मनाला संस्काराची उपक्रमशीलता देत शिक्षणाला केवळ अभ्यास न ठेवता जीवनाचा व्यापक अर्थ प्राप्त करून दिला. माधवराव पाटील महाविद्यालयात आपल्या सेवेच्या काळात त्यांनी फक्त प्राध्यापक ही सेवा बजावली नाही तर त्याबरोबर ते त्यांच्या अंगी असलेल्या विविध गुणातून स्क्रीन प्रिंटिंग, फोटोग्राफी या कलेत ते पारंगत राहिले. सुधीर यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा या परिसरात अखंडपणे तेवत ठेवला. त्यांच्या अंगी नाही हा शब्द कधीही नव्हता. महाविद्यालयीन पातळीवर त्यांनी वेळोवेळी विविध प्रकारची कामे केली. त्यांनी वृत्तपत्रांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली. या माध्यमातून त्यांनी त्यांच्या परिसरातील विविध विषयांना न्याय दिला. तसेच विविध सामाजिक विषयावर लेख लिहून प्रकाशित केले. त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर 66 च्यावर शोधनिबंध नामांकित जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. ते वाणिज्य विषयाच्या आय. सी. ए. चे आजीवन सदस्य. त्यांच्या विषयाच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये औरंगाबाद, हैदराबाद, जयपूर, उदयपूर आदी ठिकाणी जाऊन शोधनिबंधाचे सादरीकरण केले. विविध महाविद्यालयात साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले आहे. त्यांचा महाराष्ट्रातच नाही तर इतर राज्यात देखील मोठा शैक्षणिक संपर्क, मित्रपरिवार आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगरच्या ऍडमिनिस्ट्रेटिव्ह अभ्यास मंडळावर सदस्य, एनईपी-2020 अभ्यासक्रमात, यापूर्वीही त्यांनी विद्यापीठाच्या वाणिज्य विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. वाणिज्य विद्याशाखेत संगणक या विषयाचे ज्ञान अवगत व्हावे म्हणून सन 2002-03 च्या काळात तत्कालीन अधिष्ठात्यांना वाणिज्य शाखेत बदलत्या काळानुरूप तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल संगणक हा विषय किती महत्त्वाचा आहे, हे पटवून देऊन अभ्यासक्रमात तीनही वर्षाला बेसिक कॉम्प्युटर, वर्ड एक्सेल, टॅली कॉम्प्युटराईजड, अकाउंटिंग, ई-कॉमर्स आदी विषय सर्वप्रथम विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात प्रोफेसर डॉ. सुधीर पंचगल्ले यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. सुधीर आज 31 वर्षे वाणिज्य विषयाची सेवा बजावून दि. 30 एप्रिल 2026 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असून हा त्यांचा शेवट नसून आयुष्यभर ज्ञानदीप प्रज्वलित ठेवणाऱ्या तेजस्वी प्रवासाचा एक शांत समाधानकारक आणि सुवर्णमयी विराम असतो. सर निवृत्त होत असले तरी तुमच्या विचारांची, संस्काराची आणि प्रेरणेची किरणे अनंत काळ विद्यार्थ्यांच्या जीवनात उजळत राहतील, यात शंकाच नाही. त्यांच्या या जीवन प्रवासात त्यांच्या पत्नी सौ. विजया बेलकेरी या मुरूम येथील स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयातून जीवशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका म्हणून एक वर्षापूर्वीच सेवानिवृत्त झाल्या. त्यांचे चिरंजीव अनिकेत एमबीबीएस शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात योगदान देत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूम संस्थेने आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार-2025, नॅशनल एक्सलन्स अचीव्हर्स अवार्ड-2025, राजश्री शाहू महाराज आंतरराष्ट्रीय सन्मान पुरस्कार-2019 आणि त्यांना नुकताच शिर्डी येथे 1 फेब्रुवारी 2026 रोजी बी. दि. चेंज फाउंडेशन तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला. एक कर्तव्यदक्ष प्राध्यापक, मार्गदर्शक आणि आदर्श व्यक्तिमत्व महाविद्यालयातून सेवानिवृत्त होत आहे. सेवानिवृत्ती ही शेवट नसून एका नव्या प्रवासाची सुरुवात आहे. प्रोफेसर डॉ. सुधीर पंचगल्ले यांचे कार्य, त्यांची निष्ठा आणि त्यांचे आदर्श पुढील पिढीसाठी दीपस्तंभासारखे ठरतील. त्यांनी निर्माण केलेला आदर्श कायम प्रेरणा देत राहील. पुढील काळासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो ! याच त्यांना मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा !




**प्रा. डॉ. मारोती कच्छवे**

वाणिज्य विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

के. रमेश वरपूडकर महाविद्यालय,

सोनपेठ, जि. परभणी